## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ ची साक्ष

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संतोष बापू गलोले, वय – ४० वर्षे,

व्यवसाय – नोकरी, पो.हवा.

रा. – सध्या ने.सावंतवाडी, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

## शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे प्र. सहा.सरकारी अभियोक्ता श्री. ए.ए.गुमास्ते यांचे मार्फत.

०१. दि. २०/१०/२०२२ रोजी मी विजयदुर्ग पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी गुन्हा क्र.१९/२०२२ चा तपास माझ्याकडे देण्यात आला. तपासकामी मी साक्षीदारांचे तपासटिपण नोंदवली, आरोपीला नोटीस दिली, वाहनांची कागदपत्रे तपासकामी दाखल केले, दोन्ही वाहनांची आर.टी.ओ कडून तपासणी केली व त्याचे रिपोर्ट याकामी दाखल केले, मयताच्या मृत्यूची नोंद करुन त्याचे प्रमाणपत्र याकामी दाखल केले. त्यानंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

## आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञा श्रीमती एस.एस.कालेकर यांचे मार्फत.

०२. या तपासकामाचा आदेश मला मिळाला होता. मला तोंडी आदेश मिळाला होता. हे खरे नाही की, मला कोणताही आदेश मिळाला नव्हता त्यामुळे मी कागदोपत्री आदेश याकामी दाखल केला नाही. हे खरे की, घटनेवेळी बरेच लोक घटनास्थळी जमले होते. हे खरे की, घटनास्थळ हे रहदारीच्या ठिकाणी आहे. हे खरे की, घटनास्थळ चढउताराचे व वळणावळणाचे आहे. हे खरे की, घटना ऑक्टोबर महिन्यात घडल्यामुळे रात्र लवकर होत होती. हे खरे नाही की, देवगडकडून येणारे वाहन हे घटनास्थळी उजव्या साईडला झुकते. हे खरे की, घटनास्थळी दोन्ही बाजूला साईडपट्ट्या आहेत. हे खरे की, घटनास्थळी समोरुन येणाऱ्या वाहनाचा प्रकाशझोत डोळयावर पडतो. हे खरे नाही की, त्यामुळे समोरुन येणाऱ्या वाहनाचा तोल सुटण्याची शक्यता असते. हे खरे की, यातील मयत घटनेवेळी हेल्मेट घातले होते किंवा कसे याचा तपास मी केला नाही. हे खरे नाही की, यातील मयताच्या वाहनाचा विम्याची मुदत संपली आहे किंवा कशी याबाबत मी तपासकाम केले नव्हते. हे खरे नाही की, मोटार वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस देणे आवश्यक असते. हे खरे की, मयताच्या वाहनाचे पी.यु.सी सर्टीफिकेट आहे किंवा नाही याबाबत तपास करण्यास मला काही अडचण

नव्हती. हे खरे की, मयताच्या गाडीच्या वेगाबाबत मी तपासकाम केले नव्हते. हे खरे की, घटनेनंतर आरोपीनेच घटनेतील जखमीला उपचारासाठी नेले होते. माझ्या तपासकामावेळी आरोपी व मयताचे नातेवाईक यांच्यामध्ये तडजोडीची बोलणी चालू होती किंवा नाही याबाबत मला माहीत नाही. हे खरे नाही की,मयताच्या नातेवाईकांनी मागितलेली रक्कम आरोपीने दिली नाही म्हणून खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे खरे नाही की, आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नसताना खोटे दोषारोपपत्र दाखल केले व आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(श्रीमती एन.बी.घाटगे)
न्यायंडाधिकारी वर्ग–१, देवगड

दि. १७/१२/२०२४